एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना अतिरिक्त आहार देणेसाठी विशेष घटक योजनेंतर्गत (SCP) सन २०१७-१८ साठी उपलब्ध केलेला निधी वितरित व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१८/प्र.क्र.८१/का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०६ मार्च, २०१८

वाचा :- १. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्रक्र ७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्रक्र ९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७.

प्रस्तावना :-

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना अतिरिक्त आहार देणेसाठी विशेष घटक योजनेंतर्गत (SCP) सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात रु.४८.०० कोटीची (२२३६-०६०८) तरतुद BDS वर प्राप्त झालेली आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना अतिरिक्त आहार देणेसाठी विशेष घटक योजनेंतर्गत (SCP) सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात रु.४८ कोटीची (२२३६-०६०८) तरतुद याखाली अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना अतिरिक्त आहार देणेसाठी विशेष घटक योजनेंतर्गत (SCP) सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात लेखाशिर्ष २२३६-०६०८ खाली रु रु.४८ कोटी (अक्षरी रुपये अठ्ठेचाळीस कोटी फक्त) इतका निधी वित्त विभागाच्या दि. १८ एप्रिल,२०१७ व दि. ३० जून,२०१७ च्या परिपत्रकान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याच्या अधिन राहून संबंधितांना /आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांना वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच वितरीत तरतूद ही अनुसूचित जाती व नव- बौध्द घटकाचे लाभार्थ्यांवरच खर्च होईल याची दक्षता /आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांनी घ्यावी.

सदर योजना राबविण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचना नुसार सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या उपलब्ध तरतुदीतून वितरीत करावयाच्या व खर्च करावयाच्या निधीचा लेखाशिर्षनिहाय तपशील पुढील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

लेखाशिर्ष	आयुक्त,ए.बा.विकास सेवा योजना यांनावितरीत करावयाचा निधी
(२२३६ ०६०८)	४८००.००
एकुण	**४८००.००**

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०७१७५२३४०८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.03.13 15:57:27 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
४) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१०) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
११) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी).
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१३) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
१६) संबंधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२)/ वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई
१८) कक्ष अधिकारी (का-४) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.